लोकमत

# विद्यापीठात आज 'गांधी विचार' कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात गांधी अभ्यास केंद्रातर्फे आज सकाळी १०.३० वाजता 'गांधी विचार : आकलन आणि औचित्य' या विषयावर कार्यशाळा होणार आहे. त्यामध्ये डॉ. अशोक चौसाळकर, किशोर बेडकिहाळ, चैत्रा रेडकर, विजय तांबे विचार मांडणार आहेत. महात्मा गांधी यांच्याविषयी असलेल्या तीन खंडांचे प्रकाशन ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ प्रा.डॉ. अरुण भोसले यांच्या हस्ते होणार आहे. या खंडांवरील चर्चेत डॉ. रेडकर, भारती पाटील, विजय तांबे सहभागी होणार आहेत.

29 APR 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पुस्तकाशी मस्तक जोडणारे ग्रंथ प्रदर्शन

## राजर्षी शाहू कृतज्ञता पर्व : वाचन संस्कृतीचा जागर; ५० हजाराहून अधिक ग्रंथ उपलब्ध

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही.. हे जाणून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या जनतेला शहाणे करण्यासाठी शिक्षणाचा कायदा केला, बोर्डिंग स्कूल उभारले...अशा या द्रष्ट्या राजाच्या स्मृती शताब्दी वर्षात त्यांनी उभारलेल्या शाहू मिलमध्ये वाचन संस्कृतीचा जागर करत गुरुवारी ग्रंथ प्रदर्शनाला सुरुवात झाली. पुस्तकाशी मस्तक जोडणाऱ्या या प्रदर्शनात शाहू महाराजांच्या जीवनावरील तसेस विविध विषयांवरील ५० हजारांहून अधिक ग्रंथ वाचकांसाठी उपलब्ध आहेत. या संधीचा लाभ घेत पहिल्याच दिवशी कोल्हापूरवासीयांनी प्रदर्शनाला उदंड प्रतिसाद दिला.

तीन दिवस चालणाऱ्या या ज्ञान महोत्सवात विविध बुक स्टॉलकडून, वाचकांना पुस्तक खरेदीवर १० ते ४० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात आली आहे. साहित्य अकादमी पुरस्कार विजेते साहित्यिक किरण गुरव आणि सोनाली नवांगुळ यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून प्रदर्शनाचे उदघाटन झाले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, डॉ. नमिता खोत, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अपर्णा वाईकर उपस्थित होत्या.




कोल्हापुरात गुरुवारी राजर्षी शाहू कृतज्ञता पर्वाअंतर्गत शाहू मिलमध्ये गुरुवारपासून सुरु झालेल्या ग्रंथ प्रदर्शनाला पहिल्याच दिवशी शालेय विद्यार्थिनींनी व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. (छाया : आदित्य वेल्हाळ)




### शाहूंचे जीवन व कार्यावर विशेष दालन

या प्रदर्शनात छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन व कार्यावरील ११० ग्रंथांचे शिवाजी विद्यापीठाचे विशेष दालन तसेच करवीर नगर वाचन मंदिरातील महाराजांवरील ४० पुस्तके आहेत. शाहू महाराजांच्या जीवनावरील ४४ प्रकाशित प्रबंध आणि संशोधन उपलब्ध आहेत.

कुलगुरू शिर्के यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृतज्ञता पर्वानिमित्त आयोजित करण्यात आलेले विशेष ग्रंथ प्रदर्शन वाचकांसाठी एक पर्वणी ठरणार असून करवीरवासीयांनी त्याला, 'न भूतो न भविष्यते' असा प्रतिसाद द्यावा असे आवाहन केले.

जिल्हाधिकारी रेखावार यांनी हे प्रदर्शन कोल्हापूरकरांना राजर्षी शाहूंच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी असल्याचे सांगितले. राज्यभरातील सुमारे ५८ प्रकाशक सहभागी झाले असून एकूण ९५ स्टॉल्स आहेत. सुमारे ५० हजारांहून अधिक ग्रंथ वाचकांना पाहण्यासाठी आणि विक्रीसाठी उपलब्ध आहेत.



राजर्षी शाहू कृतज्ञता पर्वाअंतर्गत शाहू मिल येथे चित्रकलेचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनात गंगाराम कांबळे यांच्या हॉटेलवर शाहू महाराज चहा पितात या घटनेचे सांकेतिक चित्र मनाला चांगलेच भावते.

लोकमत



शिवाजी विद्यापीठात गुरुवारी औद्योगिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शेजारी रवी डौली, एस. डी. डेळेकर, संजय शेटे, दीपक पाटील, आर. जी. सोनकवडे, सतीश शेळके आदी उपस्थित होते.

# औद्योगिक संस्थांशी दर तीन महिन्यांनी बैठक

## शिवाजी विद्यापीठातील बैठकीत निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील संवाद अधिक दृढ करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ आणि कोल्हापुरातील औद्योगिक संस्थांची दर तीन महिन्यांनी बैठक होणार आहे. त्याबाबतचा निर्णय गुरुवारी विद्यापीठातील कार्यशाळेत घेण्यात आला.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृतज्ञता पर्वांतर्गत औद्योगिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी विद्यापीठातील सैफ सेंटर आणि उद्योग संवाद केंद्रातर्फे कार्यशाळा घेण्यात आली. त्याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले. कार्यशाळेत चर्चा करण्यात आली. त्यामध्ये जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक सतीश शेळके, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे, गोशिमाचे अध्यक्ष मोहन पंडितराव, मॅकचे अध्यक्ष संजय पेंडसे, आयआयएफचे अध्यक्ष विनय खोबरे, स्मॅकचे अध्यक्ष दीपक पाटील, सीआयआयचे अध्यक्ष रवी डोली, समन्वयक एस. डी. डेळेकर सहभागी झाले. सैफ सेंटरचे प्रमुख प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी कार्यशाळेच्या आयोजनाची माहिती दिली. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

### तफावत कमी करावी

या कार्यशाळेत डॉ. शिर्के यांनी चक्रीय अर्थव्यवस्था, कचरा व्यवस्थापन, एकत्रित कार्यशाळा आयोजनाबाबत मार्गदर्शन केले. औद्योगिक कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा आयोजनाबद्दल डॉ. सोनकवडे, डेळेकर यांचे कौतुक केले. डॉ. पाटील म्हणाले, पुस्तकी अभ्यासक्रम आणि औद्योगिक क्षेत्रात प्रत्यक्ष केले जाणारे काम यामध्ये असणारी तफावत कमी करण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे.

लोकसत्ता

# उच्चशिक्षण संस्थांमध्ये बदलांसाठी समिती

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अंमलबजावणीची तयारी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राज्यातील ५० वर्षे जुन्या शिक्षण संस्थांना विद्यापीठाचा दर्जा, एकल, समूह किंवा पदवी देणाऱ्या स्वायत्त महाविद्यालयांची स्थापना, उच्च शिक्षण संस्थांचा भविष्यवेधी आराखडा, अध्ययन अध्यापनासाठी शैक्षणिक उत्कृष्टता केंद्राची स्थापना या साठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने तज्ज्ञ समिती नियुक्त केली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तील तरतुदींची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठीच्या शिफारशींचा अहवाल सादर करण्यासाठी समितीला तीन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

शैक्षणिक धोरणाचा अभ्यास करून राज्यात अंमलबजावणी करण्याबाबतचा अहवाल ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या समितीने राज्य शासनाला सादर केला. तातडीने हाती घ्यावयाचा किंवा किमान संसाधने आवश्यक असलेला कार्यक्रम, मध्यम मुदतीचा किंवा मध्यम संसाधने आवश्यक असलेला कार्यक्रम, दीर्घकालीन किंवा मोठी गुंतवणूक आवश्यक असलेला कार्यक्रम या स्वरूपात समितीच्या शिफारशींचे वर्गीकरण करण्यात आले. त्यानंतर आता एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्ज्वला चक्रदेव यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, रुसाचे प्रकल्प संचालक डॉ. विजय जोशी, मुंबई विद्यापीठाचे अधिसभा सदस्य वैभव थोरात, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार आदी बारा सदस्यांचा समावेश आहे.

एकीय किंवा समूह विद्यापीठांचे पदवी प्रदान करणाऱ्या बहुशाखीय स्वायत्त महाविद्यालयांमध्ये रुपांतर करण्यासाठी आवश्यक पात्रता, निकषांचा मार्गदर्शक तत्त्वांसह आराखडा, उच्च शिक्षण संस्थांचे संशोधनाधिष्ठित आणि अध्यापनाधिष्ठित विद्यापीठांमध्ये रूपांतर होण्यासाठी मानांकन पद्धती, क्रमवारिता पद्धतीची यंत्रणा निश्चिती, ५० वर्षे पूर्ण झालेल्या उच्च शिक्षण संस्थांना विद्यापीठाचा दर्जा देण्यासाठीचे नियम, निकष, मानके, पात्रतेचे निकष निश्चित करण्याचा आराखडा, श्रेणीबद्ध मानांकन, श्रेणीबद्ध स्वायत्तता आणि संलग्नीकरण रद्द करण्यासाठीच्या प्रक्रियेच्या मार्गदर्शक सूचना, खुले दूरस्थ शिक्षण आणि ऑनलाइन कार्यक्रमाच्या नियमांची शिफारस, अध्ययन अध्यापनासाठी शैक्षणिक उत्कृष्टता केंद्राची स्थापना करण्याची योजना या बाबत समितीकडून शिफारशी अहवालाद्वारे सादर केल्या जातील.

### विद्यापीठ अधिनियमांत सुधारणा

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील तरतुदींनुसार सध्याच्या पद्धतींमध्ये बदल करण्यासाठी विद्यापीठ अधिनियम २०१६ आणि अन्य अधिनियमांत आवश्यक सुधारणा, शैक्षणिक संस्थांच्या अधिकार क्षेत्राबाबत पुनर्विचार या बाबत शिफारशी करण्याबाबतही शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

# बक्षीस म्हणून पुस्तक भेट देणारा लोकराजा

## राजर्षी शाहूंच्या आणखी एका पैलूवर प्रकाशझोत : ग्रंथ प्रदर्शनाला प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शालेय विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून पुस्तकेच दिली जावीत, खेड्यातील प्रत्येक शाळांना शेती सुधारणाविषयीची पुस्तके देण्यात यावीत, ग्रामीण भागातील ग्रंथालयांना सरकारी मदत देण्यात यावी, असे विविध आदेश आपल्या राजवटीत काढून त्यांची काटेकोर अंमलबजावणी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी केली.

'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या ध्येयाने त्यांनी आपली संपूर्ण हयात लोकांना शहाणे करण्यासाठी खर्ची केली होती. त्यांच्या या दूरदृष्टीच्या कार्याला ग्रंथ प्रदर्शनाच्या निमित्ताने उजाळा मिळाला.

राजर्षी शाहू महाराज स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त शाहू मिल येथे आयोजित ग्रंथ प्रदर्शनास गुरुवारी प्रारंभ झाला. ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन कोल्हापुरातील साहित्य अकादमी पुरस्कार विजेते साहित्यिक किरण गुरव आणि सोनाली नवांगुळ यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाले.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल रेखावार, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अपर्णा वाईकर यांची प्रमुख उपस्थिती होती.





कोल्हापूर : १) राजर्षी छत्रपती शाहू कृतज्ञता पर्वांतर्गत ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी साहित्यिक किरण गुरव व सोनाली नवांगुळ, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. नमिता खोत. २) ग्रंथ प्रदर्शनाला विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी आवर्जून भेट दिली. (छाया : नाज ट्रेनर)




यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृतज्ञता पर्वानिमित्त आयोजित करण्यात आलेले विशेष ग्रंथ प्रदर्शन वाचकांसाठी एक पर्वणी ठरणार आहे. सोनाली नवांगुळ यांनी शाहू विचारांचा वाहता झरा पुस्तक रूपाने प्रदर्शनात वाचकांसाठी पर्वणी ठरेल, असे सांगितले.

### विविधतेने परिपूर्ण प्रदर्शन

छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन व कार्यावरील ११० ग्रंथांचे शिवाजी विद्यापीठाचे विशेष दालन, करवीर नगर वाचन मंदिरातील महाराजांवरील ४० पुस्तके हे या प्रदर्शनाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. या ग्रंथ प्रदर्शनात राज्यभरातील सुमारे ५८ प्रकाशक सहभागी झाले असून, एकूण ९५ स्टॉल्स लावण्यात आले आहेत. त्याद्वारे या प्रदर्शनात सुमारे ५० हजारांहून अधिक ग्रंथ वाचकांना पाहण्यासाठी आणि विक्रीसाठी उपलब्ध आहेत. राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनावरील ४४ प्रकाशित प्रबंध आणि संशोधन उपलब्ध आहेत. बुक स्टॉल्सकडून वाचकांना पुस्तक खरेदीवर १० ते ४० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात येणार आहे. प्रदर्शनात आध्यात्मिक, क्रीडा, संशोधन, स्पर्धा परीक्षा, ऐतिहासिक कथा-कादंबऱ्या, चरित्रे, आत्मचरित्रे, बालसाहित्य, इंग्रजी साहित्य तसेच पाककृती, आरोग्य, धार्मिक आदी पुस्तकांचा समावेश आहे.

लेखक व वाचकांच्या आयुष्यात ग्रंथांचे योगदान मोठे असते, असे प्रतिपादन किरण गुरव यांनी केले. जिल्हाधिकारी रेखावार यांनी जिल्हावासीयांनी या ग्रंथ प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन केले. दरम्यान, विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या ग्रंथ प्रदर्शनाला भेट दिली. प्रदर्शन दि. ३० एप्रिलपर्यंत सर्वांसाठी खुले आहे.

पुढारी

# विद्यापीठ, औद्योगिक संस्थांची दर तीन महिन्यांनी बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

औद्योगिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी कार्यरत असणाऱ्या सैफ सेंटर व उद्योजक संस्थांची दर तीन महिन्यांनी बैठक घेण्याचा निर्णय सैफ सेंटर आणि यूआयआयसी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरतर्फे एकदिवसीय कार्यशाळेत घेण्यात आला.

केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या निधीद्वारे कार्यरत असणाऱ्या सैफ सेंटरमधील उच्च वैज्ञानिक आणि तांत्रिक पायाभूत सुविधा औद्योगिक क्षेत्रापर्यंत पोहोचाव्यात, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, प्रा. आर. जी. सोनकवडे यांची भाषणे झाली. अश्विनी पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

2 9 APR 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहू मिलमधील ग्रंथ प्रदर्शनात लाखो पुस्तके



कोल्हापूर : ग्रंथ प्रदर्शनाची पाहणी करताना जिल्हाधिकारी राहुल रेखावार व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राजर्षी शाहू महाराज स्मृती जन्मशताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त शाहू मिल येथे आयोजित करण्यात आलेल्या ग्रंथ प्रदर्शनास कोल्हापूरवासीयांनी उदंड प्रतिसाद दिला. दि. २८ ते ३० एप्रिल या कालावधीत होणाऱ्या या ग्रंथ प्रदर्शनाचे कोल्हापुरातील साहित्य अकादमी पुरस्कार विजेते साहित्यिक किरण गुरव आणि सोनाली नवांगुळ यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल रेखावार, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अपर्णा वाईकर आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी म्हणाले, हे ग्रंथ प्रदर्शन सर्वांसाठी खुले असून, शाहू महाराजांबद्दल असलेली कृतज्ञता व्यक्त करण्याची एक संधी आहे.

ग्रंथ प्रदर्शन वाचकांसाठी एक पर्वणी ठरणार असून, करवीरवासीयांनी त्याला न भूतो न भविष्यति असा प्रतिसाद द्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

उद्घाटनानंतर कुलगुरू डॉ. शिर्के व जिल्हाधिकारी रेखावार यांच्यासह मान्यवरांनी प्रदर्शनात सहभागी झालेल्या विविध ग्रंथ प्रकाशक व वितरकांच्या स्टॉल्सची पाहणी करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन व कार्यावरील ११० ग्रंथांचे शिवाजी विद्यापीठाचे विशेष दालन, तर करवीर नगर वाचन मंदिरातील महाराजांवरील ४० पुस्तके हे या प्रदर्शनाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. या ग्रंथ प्रदर्शनात राज्यभरातील सुमारे ५८ प्रकाशक सहभागी झाले असून, एकूण ९५ स्टॉल्स लावण्यात आले आहेत. त्याद्वारे या प्रदर्शनात सुमारे ५० हजारांहून अधिक ग्रंथ विक्रीसाठी उपलब्ध आहेत. प्रदर्शनात आध्यात्मिक, क्रीडा, संशोधन, स्पर्धा परीक्षा, ऐतिहासिक कथा-कादंबऱ्या, चरित्रे / आत्मचरित्रे, बालसाहित्य, इंग्रजी साहित्य तसेच पाककृती, आरोग्य, धार्मिक आदी पुस्तकांचा समावेश आहे. उद्घाटनानंतर जिल्ह्यातील विविध शाळा आणि महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी ग्रंथ प्रदर्शनाला उपस्थिती दर्शवली.

पुण्यनगरी


# मार्गदर्शकामुळे संशोधनातून समाजाला योगदान : डॉ. महाजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संशोधनाप्रती मार्गदर्शकाचे गांभीर्य व सातत्य महत्त्वाचे योगदान देते. संशोधनाचा दर्जा आणि संशोधनातील नैतिकता ही मार्गदर्शकाच्या वर्तनावर अवलंबून आहे. बहुआयामी संशोधनातून अर्थव्यवस्थेला व समाजाला योगदान देण्यामध्ये मार्गदर्शकाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे आयोजित तरुण संशोधन मार्गदर्शकांच्या कौशल्यांचे सशक्तीकरण या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी डॉ. सारंग भोला व प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. केदार मारुलकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अर्चना मानकर यांनी आभार मानले. यासाठी अश्विनी कांबळे, दीप्ती भोसले, नेताजी दबडे व केतकी कांबळे यांनी परिश्रम घेतले.

सकाळ



कोल्हापूर : जिल्हा प्रशासनातर्फे आयोजित लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त आयोजित प्रदर्शनातील पुस्तकांची पाहणी करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जिल्हाधिकारी राहुल रेखावार.

# शाहू मिलमध्ये ज्ञानाचा महोत्सव खुला

## ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन; ५० हजारांवर ग्रंथ

कोल्हापूर, ता. २८ : लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त आयोजित ग्रंथ प्रदर्शनात राज्यभरातील सुमारे ५८ प्रकाशक, ९५ स्टॉल्स व ५० हजारांवर ग्रंथ मांडले आहेत. श्री शाहू छत्रपती मिल येथे प्रदर्शन भरविले आहे. साहित्य अकादमी पुरस्कार विजेते साहित्यिक किरण गुरव आणि सोनाली नवांगुळ यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून त्याचे उद्‌घाटन झाले. जिल्हाधिकारी राहूल रेखावार, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अपर्णा वाईकर उपस्थित होते.

श्री. रेखावार म्हणाले, ''ग्रंथ प्रदर्शन सर्वांसाठी खुले असून, शाहू महाराजांबद्दल असलेली कृतज्ञता व्यक्त करण्याची एक संधी आहे. जिल्हावासीयांनी प्रदर्शनाला भेट देऊन याचा लाभ घ्यावा.''

कुलगुरू डॉ. शिर्के व श्री. रेखावार यांच्यासह अन्य मान्यवरांनी प्रदर्शनात सहभागी झालेल्या विविध ग्रंथ प्रकाशक व वितरकांच्या स्टॉल्सची पाहणी केली. छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन व कार्यावरील ११० ग्रंथांचे शिवाजी विद्यापीठाचे विशेष दालन तर करवीर नगर वाचन मंदिरातील महाराजांवरील ४० पुस्तके प्रदर्शनाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

### राजर्षी शाहूंवरील ग्रंथ

प्रदर्शनात शाहू महाराजांच्या जीवनावरील ४४ प्रकाशित प्रबंध आणि संशोधन उपलब्ध आहेत. आध्यात्मिक, क्रीडा, संशोधन, स्पर्धा परीक्षा, ऐतिहासिक कथा - कादंबऱ्या, चरित्रे, आत्मचरित्रे, बालसाहित्य, इंग्रजी साहित्य, पाककृती, आरोग्य, धार्मिक पुस्तके प्रदर्शनात मांडली आहेत.

### पावसाचा व्यत्यय

दरम्यान, सायंकाळी सात वाजता सुरू होणारा अभिवाचनाचा कार्यक्रम पावसामुळे रद्द करण्यात आला. तो रविवारी (ता. १) सायंकाळी सात वाजता श्री शाहू छत्रपती मिल येथे होणार आहे.

तीन दिवस चालणाऱ्या ज्ञान महोत्सवात विविध बुक स्टॉलकडून वाचकांना पुस्तक खरेदीवर १० ते ४० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात येणार आहे. या संधीचा लाभ वाचकांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

2 9 APR 2022 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वातंत्र्यसैनिकांचा चरित्रकोश तयार करणार

## स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव; महाविद्यालये करणार माहितीचे संकलन

डी. आर. पाटील : सकाळ वृत्तसेवा



"कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या कामगिरीवर चरित्र कोषाद्वारे प्रकाश टाकला जाणार आहे. जवळच्या महाविद्यालयातील इतिहास विभाग माहिती संकलित करणार आहे. माहिती असणाऱ्या अथवा याकामी रुची असणाऱ्यांनी जवळच्या महाविद्यालयाशी संपर्क साधावा.

-डॉ. अवनिश पाटील,
चरित्रकोष समन्वयक व इतिहास अधिविभागप्रमुख



सरूड, ता. २८ : शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामार्फत व विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या महाविद्यालयांच्या इतिहास विभागामार्फत कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिकांचा चरित्रकोश तयार केला जात आहे. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प १५ ऑगस्ट २०२२ ला चरित्रकोषाच्या माध्यमातून प्रकाशित होणार आहे.

भारताच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव देशभर साजरा होत आहे. याच पार्श्वभूमीवर स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली आणि हे स्वातंत्र्य मिळवून देण्यामध्ये ज्यांचे खरेखुरे योगदान आहे अशा दुर्लक्षित व अप्रकाशित हीरोंची इतिहास विभाग नोंद घेणार आहे.

दरम्यान, ही माहिती संकलित करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू झाले असून यासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्याला प्रत्येकी एक समन्वयक निवडला गेला आहे. हे समन्वयक त्या-त्या जिल्ह्यातली स्वातंत्र्यसैनिकांची माहिती संबंधित महाविद्यालयांच्या शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्याकडून संकलित करणार आहेत.

संबंधित स्वातंत्र्य सैनिकांचे फोटो अथवा हयात असल्यास त्यांच्या मुलाखती किंवा त्यांच्या नातेवाइकांच्या मुलाखतीसुद्धा संकलित केल्या जाणार आहेत. सांगली, कोल्हापूर, साताऱ्यातील स्वातंत्र्य सैनिकांची यादी आहे; परंतु अपवाद वगळता त्यांचे स्वातंत्र्य लढ्यातील काम विस्तृतपणे कुठेही लिखित स्वरूपात नाही. यानिमित्ताने अप्रकाशित स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्यावर प्रकाश पडणार आहे.

दरम्यान बी.ए.भाग तीनच्या पेपर -१६ साठी १० गुणांस आपल्या परिसरातील स्वातंत्र्यसैनिक चरित्रकोषासाठी माहिती संकलनाचा प्रकल्प दिला जाणार आहे. यामुळे विद्यापीठाच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या पूर्ततेत विद्यार्थ्यांचाही सक्रिय सहभाग राहणार आहे. यामुळेच सर्वांच्या प्रयत्नातून इतिहासाचा अमूल्य ठेवा पुढे येणार आहे.

29 APR 2022 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# औद्योगिक संस्थांच्या सहाय्याने प्रश्न सोडवू : कुलगुरू डॉ. शिर्के



कोल्हापूर : छत्रपती शिवाजी महाराज व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, संजय शेटे व इतर.

कोल्हापूर, ता. २८ : औद्योगिक संस्थांना कुशल मनुष्यबळाबरोबरच तांत्रिक समस्यांचे निराकरण आणि मूलभूत संशोधन या बाबतीत शिवाजी विद्यापीठ उपयोगी ठरू शकते. भविष्यात औद्योगिक संस्थांच्या साथीने विविध प्रश्न सोडवू. यासाठी दर तीन महिन्यांनी एकत्रित बैठक घेऊ, असा विश्वास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केला. औद्योगिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी एक दिवसाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये ते बोलत होते. सोफिस्टिकेटेड ॲनॅलेटिकल इन्स्ट्रुमेंट फॅसिलिटीज (सैफ) आणि युनिव्हर्सिटी इंडस्ट्री इंटरॅक्शन सेंटर यांच्यातर्फे या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यापीठातील केंद्र सरकारच्या 'विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या' निधीद्वारे कार्यरत असणाऱ्या सैफ सेंटरमधील उच्च वैज्ञानिक आणि तांत्रिक पायाभूत सुविधा औद्योगिक क्षेत्रापर्यंत पोहोचाव्या हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. त्याचबरोबर औद्योगिक क्षेत्रातील प्रश्न समजून घेऊन त्यावर एकत्रित येऊन कशापद्धतीने उपाययोजना करता येतील यावर सुद्धा चर्चा या कार्यशाळेत झाली.

सुरुवातीला सैफ सेंटरचे प्रभारी प्रमुख प्रा. डॉ. आर. जी., सोनकवडे यांनी कार्यशाळेबद्दल थोडक्यात माहिती दिली.

प्र-कुलगुरु प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी संपूर्ण चर्चासत्राचा गोषवारा सांगितला. पुस्तकी अभ्यासक्रम आणि औद्योगिक क्षेत्रात प्रत्यक्ष केले जाणारे काम यामध्ये असणारी तफावत कमी करण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. मोठ्या अडचणी समजून घेऊन त्या सोडवणे जिकिरीचे असते, त्यात खूप जास्त वेळ जाऊ शकतो. लहान उद्योगांचे छोटे प्रश्न प्रथम घेऊन सतत संपर्कात राहणे गरजेचे आहे. असे ते म्हणाले.

कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, "औद्योगिक संस्थांना लागणारे कुशल मनुष्यबळ, तांत्रिक साहाय्य या गोष्टी विद्यापीठाच्या माध्यमातून होऊ शकतात. यासाठी एकत्रित येणे गरजेचे आहे." अश्विनी पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## कार्यशाळेबद्दल मांडले मत

द इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन फाउंड्रीमेन, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज, शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, भारतीय उद्योग परिसंघ, जिल्हा उद्योग केंद्र, गोशिमा, मॅक अशा विविध संस्थांच्या अध्यक्षांनी कार्यशाळेबद्दल मनोगत व्यक्त केले.

2 9 APR 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आशा स्वयंसेविकांचे काम जागतिक पातळीवर



■ शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या डॉ. प्रतिभा देसाई यांचा शोधनिबंध

प्रतिनिधी
कोल्हापूर

यु. के. कॉन्फरन्स सिरीज एल. एल. सी. लिमिटेडतर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय वेबीणारसाठी शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विषयाच्या डॉ. प्रतिभा देसाई यांची निवड झाली. '**7th World Conference on 'Public Health and Nutrition'** या विषयावरील हे वेबीणार आहे. या वेबिणारसाठी जगभरातील भारत, इजिप्त, हंगेरी, इथोपिया, नायजेरिया, इटली, चीन, पाकिस्तान, कोलंबिया, रोमानिया आणि अमेरिका या राष्ट्रांमधील तेरा जणांनी आपआपल्या विषयाचे सादरीकरण केले आहे. डॉ. देसाई यांनी "**The Role of Accredited Social Health Activists (ASHAs) in Preventing and Managing COVID-19 Pandemic in Rural Western Maharashtra, India**" या विषयावर शोध निबंध सदर केला आहे. डॉ. प्रतिभा देसाई यांनी कोविड महामारीच्या काळातील कोल्हापूरातील आशा स्वयंसेविका योगदान स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. कोवीड महामारी नियंत्रणामध्ये आशा या स्वयंसेविकांची मोलाची भूमिका बजावली आहे. कोल्हापूरातील आशांनी आपला जीव धोक्यात घालून कोवीड नियंत्रण करण्यामध्ये अहोरात्र प्रयत्न केलेले आहेत. यामध्ये आशा स्वयंसेविकांची महामारीच्या काळातील परिस्थिती, कामाचे स्वरूप, आशा स्वयंसेविकांना कामादरम्यान उद्भवणाऱ्या विविध अडचणी घटकांचा प्रमुख उल्लेख होता. आरोग्य क्षेत्रातील मनुष्यबळ तुटवडा असल्यामुळे कोवीड महामारी काळामध्ये हा तुटवडा भरून काढण्याचे काम आशा स्वयंसेविकांनी केले आहे. डॉ. प्रतिभा देसाई यांनी या प्रयत्नाच्या माध्यमातून आशा स्वयंसेविकांच्या महामारीच्या काळातील योगदानाचे महत्व व जाणीव जागतिक स्तरावर करून दिली.

29 APR 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या सहकार्याने औद्योगिक संस्था प्रश्न सोडवणार

- सैफ सेंटरतर्फे आयोजित कार्यशाळेत निर्णय
- दर तीन महिन्यांनी बैठक घेणार



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सैफ सेंटरतर्फे आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन प्रसंगी सतीश शेळके, मोहन पंडितराव, संजय पेंडसे, विनय खोबरे, प्रा. आर. जी. सोनकवडे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, दीपक पाटील, संजय शेटे, डॉ. एस. डी. डेळेकर, रवी डॉली.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

पुस्तकी अभ्यासक्रम आणि औद्योगिक क्षेत्रात प्रत्यक्ष केले जाणारे काम यामध्ये असणारी तफावत कमी करण्याचा प्रयत्न करण्याची गरज आहे. लहान उद्योगांचे छोटे प्रश्न प्रथम घेऊन सतत संपर्कात राहणे गरजेचे आहे. त्यामुळे औद्योगिक संस्था आणि शिवाजी विद्यापीठ एकत्रिपणे प्रश्न सोडवणार आहेत, असा निर्णय, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृतज्ञता पर्व अंतर्गत शिवाजी विद्यापीठातील सैफ सेंटर आणि विद्यापीठ उद्योग संवाद केंद्रातर्फे आयोजित कार्यशाळेत झाला.

औद्योगिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. केंद्र सरकारच्या 'विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या' निधीतून कार्यरत सैफ सेंटरमधील उच्च वैज्ञानिक आणि तांत्रिक पायाभूत सुविधा औद्योगिक क्षेत्रापर्यंत पोहोचाव्या हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. त्याचबरोबर औद्योगिक क्षेत्रातील प्रश्न समजून घेऊन त्यावर एकत्रित येऊन कशापद्धतीने उपाय योजना करता येतील यावर कार्यशाळेत चर्चा झाली. मान्यवरांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.

सैफ सेंटरचे प्रभारी प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी या कार्यशाळेबद्दल माहिती दिली. विविध संस्थांच्या अध्यक्षांनी मनोगत व्यक्त केले. यानंतर विद्यापीठातील उच्च वैज्ञानिक आणि तांत्रिक पायाभूत सुविधांचा उपयोग औद्योगिक क्षेत्राला कसा होऊ शकेल या विषयावर मान्यवरांची चर्चा झाली. सैफ सेंटरला भेट देऊन मान्यवरांनी केंद्रातील सुविधांची माहिती घेतली.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, प्रामुख्याने चक्रीय अर्थव्यवस्था, कचरा व्यवस्थापन, विद्यापीठ आणि औद्योगिक क्षेत्राने एकत्रित कार्यशाळा घेतल्या पाहिजेत. तसेच कार्यशाळा आयोजित केल्याबद्दल डॉ. सोनकवडे यांचे कौतुक त्यांनी केले. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, शिक्षण आणि औद्योगिक क्षेत्र एकत्र आले तर त्यातून उत्तम निर्मिती होईल.

अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी सतीश शेळके (जनरल मॅनेजर, डीआयसी), मोहन पंडितराव (अध्यक्ष गोशिमा), संजय पेंडसे (अध्यक्ष एमएकेएच), विनय खोबरे (सेक्रेटरी, आयआयएफ), दीपक पाटील (अध्यक्ष, स्मॅक), संजय शेटे (अध्यक्ष, केसीसीआय), रवी डॉली (सीआयआय) आदी उपस्थित होते.

2 9 APR 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रंथप्रदर्शनातून उलघडला लोकराजा शाहूंचा जीवनप्रवास

## शिवाजी विद्यापीठातर्फे राजर्षी शाहू महाराज जीवनकार्यावरील ११० ग्रंथांचे दालन : शाहू मिल येथे ३० एप्रिलपर्यंत प्रदर्शन सुरू राहणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

लोकराजा राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनकार्यावरील ११० ग्रंथांचे विद्यापीठाचे विशेष दालन आहे. या प्रदर्शनात शाहूंचे कार्य जनतेपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर एकूण ९५ पुस्तकांचे स्टॉल असून यामध्ये जास्तीत जास्त शाहूंच्या जीवनचरित्रावर आधारीत पुस्तके आहेत. एक प्रकारे ग्रंथप्रदर्शनाच्या माध्यमातून लोकराजा शाहूंना अभिवादन करीत, ग्रंथांच्या माध्यमातून शाहूंचे जीवनकार्य करवीर वासियांना उलगडून सांगितले आहे.





कोल्हापूर : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त आयोजित कृतज्ञता पर्व अंतर्गत शाहू मिल येथे ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करताना साहित्य अकादमी पुरस्कार विजेते साहित्यिक किरण गुरव, सोनाली नवांगुळ. सोबत जिल्हाधिकारी राहूल रेखावार, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत आदी. २) राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त आयोजित कृतज्ञता पर्व अंतर्गत शाहू मिल येथे ग्रंथ प्रदर्शनात पुस्तकातून शाहूंचे कार्य समजून घेताना शालेय विद्यार्थिनी.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त आयोजित कृतज्ञता पर्वानिमित्त गुरूवारी कोल्हापुरातील साहित्य अकादमी पुरस्कार विजेते साहित्यिक किरण गुरव आणि सोनाली नवांगुळ यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अपर्णा वाईकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

उद्घाटनानंतर कुलगुरू डॉ. शिर्के व जिल्हाधिकारी रेखावार यांच्यासह मान्यवरांनी प्रदर्शनात सहभागी विविध ग्रंथ प्रकाशक व वितरकांच्या स्टॉल्सची पाहणी केली. प्रत्येक स्टॉलवर जावून विविध विषयाच्या पुस्तकांची माहिती घेतली. या ग्रंथ प्रदर्शनात राज्यभरातील ५८ प्रकाशक सहभागी झाले असून एकूण ९५ स्टॉल्स लावले आहेत. प्रदर्शनातील स्टॉलवर सुमारे ५० हजारांहून अधिक ग्रंथ उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे शिवाजी विद्यापीठ आणि करवीर नगर वाचन मंदिर यांनी केवळ राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन व कार्यावरील ग्रंथांची विशेष दालने मांडली आहेत. या दालनात शाहू महाराज यांच्या जीवनावरील शेकडो ग्रंथ वाचक रसिकांना पाहण्यासाठी उपलब्ध आहेत, अशी माहिती डॉ. नमिता खोत यांनी दिली. ग्रंथप्रदर्शन, चित्रप्रदर्शन, छायाचित्र प्रर्शन पाहण्यासाठी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांनी गर्दी केली होती. विद्यार्थ्यांनी शाहूंच्या कार्याची माहिती घेतली. काही शिक्षक आणि वाचकांनी पुस्तक खरेदी करून स्टॉलधारकांना प्रतिसाद दिला.

### वाचकांना शाहूंच्या विचाराची पर्वणी

राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृतज्ञता पर्वानिमित्त आयोजित करण्यात आलेले विशेष ग्रंथ प्रदर्शन वाचकांसाठी एक पर्वणी ठरणार आहे. करवीरवासियांनी पुरेपूर लाभ घ्यावा. छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन व कार्यावरील ११० ग्रंथांचे शिवाजी विद्यापीठाचे विशेष दालन हे या प्रदर्शनाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. तरी वाचकांनी या संधीचा लाभ घ्यावा.

– कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के (शिवाजी विद्यापीठ)